**स्वजल योजना अंमलबजावणीकरिता भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेस कार्यान्वयन यंत्रणा म्हणून नामनिर्देशित करणेबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः स्वजल-२०१९/ प्र.क्र.२५/ पापु-१०**
७ वा मजला, गोकुलदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: २६ फेब्रुवारी,२०१९.

<u>वाचा -</u>

१) युनिसेफचे पत्र क्र. एमएएच ९०३/१.०२/२४४, दि.०५.१२.२०१८
२) संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,पुणे यांचे पत्र क्र.भूसवियं/ स्वजल/५७६/२०१८, दि.२४.०९.२०१८
३) राज्यस्तरीय योजना मंजूरी समिती यांच्या दि.१२.१०.२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त बैठक-२०१८/ प्र.क्र. ४०/२०१८, दि.१२.१०.२०१८
४) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग लपापु-२०१६/प्र.क्र.०६/पापु-१५, दि.२१.०१.२०१६

<u>प्रस्तावना -</u>

पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार यांच्याद्वारे स्वजल ही समुदाय आधारित एकलगाव सौर उर्जेवरील लघुनळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्रासह इतर सर्व राज्यामधील आकांक्षीत जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे. स्वजल योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्वजल योजनेकरिता राज्यस्तरिय व जिल्हास्तरीय कार्यान्वयन यंत्रणांच्या नामनिर्देशनाची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

स्वजल योजनेकरिता राज्यातील उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार आणि वाशिम या आकांक्षीत जिल्हयांची निवड भारत सरकारमार्फत करण्यात आली आहे.

२. स्वजल योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेची अंमलबजावणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत करण्यात येत असून स्वजल योजना ही सौर उर्जेवर आधारित असल्याने व सौर उर्जेवर लघु नळ पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी भूजल सर्वेक्षण आणि विकास या यंत्रणेमार्फत

हाताळण्यात येत असल्यामुळे स्वजल योजनेकरिता " राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणा " म्हणून भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे व तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील संदर्भ क्र. ४ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हा समितीलाच जिल्हास्तरीय कार्यान्वयन यंत्रणा " जिल्हा स्वजल प्रकल्प समिती " म्हणून नामनिर्देशित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०२२५१५५७४८६०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( डॉ. रविंद्र भराटे )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
३. महालेखापाल (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महारष्ट्र-१-मुंबई/२- नागपुर,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. विभागीय आयुक्त, सर्व,
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. संचालक (वित्त) ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई,
८. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास संस्था, पुणे,
९. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर,
१०.अतिरिक्त संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
११.उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व),
१२.मुख्य खेदन अभियंता, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे/ नागपूर
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१४.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१५.वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा(सर्व),
१६.उपअभियंता(यांत्रिकी), यांत्रिकी उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)

१७.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,सर्व
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व,
१९.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई,
२०.पापु-०४/२०/२३, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१.निवडनस्ती पापु-१०.